सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
गृह विभाग
**मुंबई पोलीस**

## पोलीस उप आयुक्त, वाहतूक (पश्चिम उपनगरे), मुंबई यांचे कार्यालय

सशस्त्र पोलीस प्रशिक्षण, क्रिडा व कल्याण इमारत, पहिला मजला, १/७, कलिना, सांताक्रुझ चेंबूर लिंक रोड, कलिना युनिव्हर्सिटी समोर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई – ९८. Email – dcpsub.traffic@mahapolice.gov.in

जा.क्र.१०८६/पोउपआ/वाहतूक/पश्चिम उपनगरे/ता. अधिसूचना/२०२६, दिनांक – ०७/०७/२०२६

### तात्पुरती अधिसूचना / आदेश

अधिसूचना क्रमांक -७६२ /पोउपआ/वाहतूक/पश्चिम उपनगरे/ता. अधिसूचना/२०२६, दिनांक – ०७/०७/२०२६

ज्या अर्थी, समता नगर वाहतूक विभागाच्या हद्दीतील लोखंडवाला कॉम्प्लेक्स, कांदिवली पूर्व, मुंबई येथील **म्हाडा रोड क्रमांक १, २ व ३** या पूर्व-पश्चिम रस्त्यांवर दुतर्फा अनियंत्रित वाहन पार्किंग होत असल्याने तसेच संबंधित रस्त्यांची रुंदी कमी असल्यामुळे वाहतुकीस वारंवार अडथळा निर्माण होऊन वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे या रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर सम-विषम पार्किंग व्यवस्था लागू करणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, अजित बोऱ्हाडे, पोलीस उपायुक्त, वाहतूक (पश्चिम उपनगरे), मुंबई, मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम ११५ तसेच केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ५९ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून तसेच शासन निर्णय क्रमांक एमव्हीए-०५८९/प्र.क्र.१०६१/टीआर-२, दिनांक १९/०५/१९८९, एम.जी.जी. भाग ४-अ, दिनांक २०/०९/१९९० व शासन निर्णय क्रमांक एमव्हीए-००१९६/८७१/प्र.क्र.३७/सीआर-२, दिनांक २७/०९/१९९६, एम.जी.जी. भाग १-व्ही-अ (असाधारण) क्रमांक ३०७ अन्वये अधिसूचना निर्गमित दिनांकापासून पुढील ३ महिन्यांसाठी प्रायोगिक तत्वावर खालीलप्रमाणे तात्पुरती वाहतूक व्यवस्था लागू करीत आहे.

**सम-विषम पार्किंग व्यवस्था**

समता नगर वाहतूक विभागाच्या हद्दीतील लोखंडवाला कॉम्प्लेक्स, कांदिवली पूर्व, मुंबई येथील **म्हाडा रोड क्रमांक १, २ व ३** हे पूर्व - पश्चिम रस्ते असून, तेथे -

१. महिन्याच्या **सम तारखेस** संबंधित रस्त्यांच्या **दक्षिणेकडील बाजूस** वाहन पार्किंग करण्यास परवानगी राहील.

२. महिन्याच्या **विषम तारखेस** संबंधित रस्त्यांच्या **उत्तरेकडील बाजूस** वाहन पार्किंग करण्यास परवानगी राहील.

सदर सम-विषम पार्किंग व्यवस्था **प्रायोगिक तत्त्वावर अधिसूचना निर्गमित दिनांकापासून पुढील तीन महिन्यांच्या कालावधीसाठी** लागू राहील. या कालावधीत वाहतूक परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार पुढील निर्णय घेण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

ही अधिसूचना पोलीस, अग्निशमन दल, रुग्णवाहिका तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

सदर अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध मोटार वाहन अधिनियम, १९८८ तसेच इतर लागू असलेल्या कायद्यांनुसार योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

ही अधिसूचना माझ्या शिक्क्यासह व स्वाक्षरीसह दि. ०७/०७/२०२६ रोजी मुंबई येथे जारी करण्यात येत आहे.

**(अजित बोऱ्हाडे)**
पोलीस उप आयुक्त, वाहतूक (पश्चिम उपनगरे)
मुंबई शहर

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
मुंबई पोलीस

**Office of the Deputy Commissioner of Police, Traffic (Western Suburbs)**
Armed Police Training, Sports & Welfare Building, 1st Floor, 1/7 Kalina, Santacruz-Chembur Link Road,
Opposite Kalina University Santacruz (East), Mumbai – 400 098 Email – dcpsub.traffic@mahapolice.gov.in

## TEMPORARY NOTIFICATION / ORDER

Notification No. 162 /DCP/Traffic/Western Suburbs/Temp. Notification/2026, Dated: 07/07/2026

**WHEREAS**, on MHADA Road Nos. 1, 2 and 3, situated within Lokhandwala Complex, Kandivali East, Mumbai under the jurisdiction of Samata Nagar Traffic Division, vehicles are being parked indiscriminately on both sides of the road. Further, due to the narrow width of these roads, frequent traffic congestion and obstruction to the free flow of vehicular traffic are being experienced. Therefore, it has become necessary to introduce an **Odd-Even Parking System** on an experimental basis to ensure smooth movement of traffic.

**NOW, THEREFORE**, I, Ajit Borhade, Deputy Commissioner of Police, Traffic (Western Suburbs), Mumbai, in exercise of the powers conferred upon me under Section 115 of the Motor Vehicles Act, 1988, read with Rule 59 of the Central Motor Vehicles Rules, 1989, and in accordance with Government Resolution No. MVA-0589/CR-1061/TR-2, dated 19/05/1989, published in M.G.G. Part IV-A dated 20/09/1990, and Government Resolution No. MVA-00196/871/CR-37/CR-2, dated 27/09/1996, published in M.G.G. Part I-V-A (Extraordinary), No. 307, hereby impose the following temporary traffic regulation on an experimental basis for a period of three (3) months from the date of issuance of this notification.

### Odd-Even Parking System

MHADA Road Nos. 1, 2 and 3 at Lokhandwala Complex, Kandivali East, Mumbai falling within the jurisdiction of Samata Nagar Traffic Division, are East-West oriented roads. The following parking arrangement shall be applicable:

1. On **even dates** of the month, parking of vehicles shall be permitted **only on the southern side** of the said roads.
2. On **odd dates** of the month, parking of vehicles shall be permitted **only on the northern side** of the said roads.

The above Odd-Even Parking System shall remain in force on an experimental basis for a period of **three (3) months from the date of issuance of this notification.** During this period, the prevailing traffic conditions shall be reviewed, and further action shall be taken as may be considered necessary.

Scanned with OKEN Scanner

This notification shall not apply to vehicles belonging to the Police Department, Fire Brigade, Ambulance Services, and other Essential Services.

Any person violating the provisions of this notification shall be liable for appropriate legal action under the Motor Vehicles Act, 1988, and other applicable laws in force.

This notification is issued under my hand and seal at **Mumbai** on this **7th day of July, 2026**.

DEPUTY COMMISSIONER OF POLICE, TRAFFIC, WESTERN SUBURBAN, MUMBAI

**(Ajit Borhade)**
DCP Traffic (Western Suburbs)
Mumbai City

Scanned with OKEN Scanner

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

**मुंबई पोलीस**

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक (पश्चिम उपनगरे), मुंबई यांचे कार्यालय

सशस्त्र पोलीस प्रशिक्षण, क्रिडा व कल्याण इमारत, पहिला मजला, १/७, कलिना, सांताक्रुझ चेंबूर लिंक रोड, कलिना युनिव्हर्सिटी समोर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई – ९८. Email – dcpsub.traffic@mahapolice.gov.in

जा.क्र.७०८६/पोउपआ/वाहतूक/पश्चिम उपनगरे/ता. अधिसूचना/२०२६, दिनांक – ०७/०७/२०२६

## :: वार्तापत्र ::

समता नगर वाहतूक विभागाच्या हद्दीतील लोखंडवाला कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व), मुंबई येथील म्हाडा रोड क्रमांक १, २ व ३ या रस्त्यांवर दुतर्फा अनियंत्रित वाहन पार्किंग तसेच रस्त्यांची कमी रुंदी यामुळे वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. सदर ठिकाणी वाहतूक सुरळीत ठेवण्याच्या उद्देशाने पुढील तीन महिन्यांसाठी प्रायोगिक तत्त्वावर सम-विषम पार्किंग व्यवस्था लागू करण्यात येत आहे.

त्यानुसार महिन्याच्या **सम तारखेस** संबंधित रस्त्यांच्या **दक्षिणेकडील बाजूस** वाहन पार्किंग करण्यास परवानगी राहील. व महिन्याच्या **विषम तारखेस** संबंधित रस्त्यांच्या **उत्तरेकडील बाजूस** वाहन पार्किंग करण्यास परवानगी राहील. ही अधिसूचना पोलीस, अग्निशमन दल, रुग्णवाहिका तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

या कालावधीत वाहतूक परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार पुढील निर्णय घेण्यात येईल. सर्व वाहनचालकांनी वाहतूक पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

पोलीस उप आयुक्त वाहतूक पश्चिम उपनगरे, मुंबई

**(अजित बोऱ्हाडे)**

पोलीस उप आयुक्त, वाहतूक (पश्चिम उपनगरे)

मुंबई शहर

Scanned with OKEN Scanner

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
गृह विभाग
मुंबई पोलीस

**Office of the Deputy Commissioner of Police, Traffic (Western Suburbs)**

Armed Police Training, Sports & Welfare Building, 1st Floor, 1/7 Kalina, Santacruz-Chembur Link Road,
Opposite Kalina University Santacruz (East), Mumbai – 400 098 Email – dcpsub.traffic@mahapolice.gov.in


**Outward No.1086 /DCP/Traffic/Western Suburbs/Temp. Notification/2026,** **Dated: 07/07/2026**

## :: PRESS NOTE ::

With a view to ensuring the smooth flow of traffic on MHADA Road Nos. 1, 2 and 3 at Lokhandwala Complex, Kandivali East, Mumbai, falling under the jurisdiction of Samata Nagar Traffic Division, an Odd-Even Parking System is being implemented on an experimental basis for a period of three months.

Accordingly, on **even dates** of the month, vehicle parking shall be permitted only on the **southern side of the said roads**, while on **odd dates**, vehicle parking shall be permitted only on the **northern side of the said roads**. This notification shall not apply to vehicles belonging to the Police Department, Fire Brigade, Ambulance Services, and other Essential Services.

The traffic situation will be reviewed during the experimental period, and further decisions will be taken as may be considered necessary. All motorists are requested to cooperate with the Mumbai Traffic Police by strictly complying with the above parking arrangement and following the directions issued by the Traffic Police.

DEPUTY COMMISSIONER OF POLICE, TRAFFIC, WESTERN SUBURBAN, MUMBAI

**(Ajit Borhade)**
DCP Traffic (Western Suburbs)
Mumbai City

Scanned with OKEN Scanner